## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**द्वितीय अपील क्रमांक :- २६४४/२०१८/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

१ श्री. दिपक जाधव, : अपिलार्थी
रा.पंचशिल नगर, जिपिओ मागे,
नाशिक, ता.जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभागीय स्वच्छता निरीक्षक (पश्चिम),
विभागीय कार्यालय पश्चिम विभाग,
नाशिक महानगरपालिका, नाशिक, ता.जि.नाशिक.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
संचालक,
घनकचरा व्यसवस्थापन विभाग,
नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन,
शरणपूर रोड, नाशिक, ता.जि.नाशिक.

**विवेचन**

उपरोक्त अपिलासंदर्भात आयोगाने दिनांक १८/११/२०१९ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विभागीय स्वच्छता निरीक्षक (पश्चिम), विभागीय कार्यालय, नाशिक महानगरपालिका नाशिक, श्री.दिलीप चव्हाण यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ०७/०७/२०१८ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन प्रथम अपील आदेशानुसार माहिती पुरविली नाही. तसेच माहिती पुरविण्यास हेतुपुस्सर दुर्लक्ष व टाळाटाळ केली. त्यामुळे त्यांचेविरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगासमोर सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी."

सदर आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विभागीय स्वच्छता निरीक्षक (पश्चिम), विभागीय कार्यालय, नाशिक महानगरपालिका नाशिक, श्री.दिलीप चव्हाण यांनी आयोगाकडे दिनांक २५/०२/२०२० रोजी टपालाद्वारे लेखी खुलासा सादर करुन असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांचा दिनांक ०७/०७/२०१८ रोजीचा माहिती अर्ज होता. त्यास अनुसरुन अपिलार्थीस दिनांक ०४/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती अर्जातील मुद्दा क्र.१ बाबत माहितीचे शुल्क कळविले व मुद्दा क्र.२ व ३ बाबत

वैयक्तिक व त्रयस्थ पक्षांची माहिती असल्याने देता येत नाही, असे कळविले. तसेच प्रथम अपील आदेशानुसार अपिलार्थीस दिनांक १८/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती तसेच वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविले. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही केली असल्याने माझा खुलासा मान्य करण्यात येऊन माझ्या विरुध्द शास्तीची कार्यवाही करण्यात येऊ नये, ही विनंती.

प्रस्तुत अपिलासंदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विभागीय स्वच्छता निरीक्षक (पश्चिम), विभागीय कार्यालय, नाशिक महानगरपालिका नाशिक, श्री.दिलीप चव्हाण यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ०७/०७/२०१८ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन अपिलार्थीस दिनांक ०४/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती अर्जातील मुद्या क्र.१ बाबत माहितीचे शुल्क कळविले व मुद्या क्र.२ व ३ बाबत वैयक्तिक व त्रयस्थ पक्षांची माहिती असल्याने देता येत नाही, असे कळविले. तसेच प्रथम अपील आदेशानुसार अपिलार्थीस दिनांक १८/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती तसेच वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविले असल्याचे नमूद केले यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा समर्थनीय आहे. म्हणून त्यांच्यावर शास्तीची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विभागीय स्वच्छता निरीक्षक (पश्चिम), विभागीय कार्यालय, नाशिक महानगरपालिका नाशिक, श्री.दिलीप चव्हाण यांनी केलेला खुलासा समाधानकारक असल्याने मान्य करण्यात येऊन प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत अपील अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(के. एल. बिश्नोई)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :- 10 AUG 2021

प्रती,

श्री.दिलीप चव्हाण , तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विभागीय स्वच्छता निरीक्षक (पश्चिम), विभागीय कार्यालय, नाशिक महानगरपालिका नाशिक, ता.जि.नाशिक.